**<u>शलाका आ. लोमटे, न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, (न्यायालय क्र.२), धुळे यांचे न्यायालय</u>**

**<u>संक्षिप्त फौजदारी खटला क्र.१९६५/२०२६</u>**

**<u>निशाणी १ लगत.</u>**

| | | |
|---|---|---|
| घटनेची तारीख व वेळ | : | २९.०४.२०२६. |
| गुन्हा नोंदविल्याची तारीख | : | ०७.०८.२०२६. |
| घटना घडल्याचे ठिकाण | : | कराची चौक, धुळे. |
| फिर्यादीचे नाव | : | सरकार तर्फे शहर वाहतुक शाखा, धुळे. |
| आरोपीचे नाव व पत्ता | : | **धिरज महेश अग्रवाल,**<br>**वय :** २९ वर्षे, **व्यवसाय :** निरंक,<br>**राहणार :** अग्रवाल नगर, धुळे. |

**अपराधाचा तपशील,**

दिनांक २९.०४.२०२६ रोजी रात्री १९.१५ वाजेच्या सुमारास तुम्ही तुमच्या ताब्यातील मोटारसायकल क्र.एम.एच.–१८–बी.एस.२७७२ ने धुळे शहरातील कराची चौक येथून परोळा रोडकडे जात असतांना तुमची ब्रेथ अनालायर मशिनद्वारे तपासणी केली असता, तुम्ही अंमली पदार्थाचे सेवन करुन वाहन चालवितांना मिळून आला आणि याद्वारे तुम्ही **मोटार वाहन कायदा कलम १८५** प्रमाणे गुन्हा केलेला आहे.

दोषारोपाचा तपशिलवार मजकुर आरोपीला त्याचे भाषेत वाचुन व समजावून सांगितला. आरोपीने गुन्हा कबुल केला.

**<u>आरोपीचे परिकथन</u>**

**प्रश्न क्र.१** : तुम्हाला केस पेपरच्या नकला मिळाल्या काय ?

**उत्तर** : होय.

**प्रश्न क्र.२** : तुम्हाला दोषारोपाचा तपशील समजला काय ?

**उत्तर** : होय.

**प्रश्न क्र.३** : तुम्हाला गुन्हा कबुल आहे काय ?

**उत्तर** : होय.

समक्ष,

SHALAKA ANNASAHEB LOMTE Digitally signed by SHALAKA ANNASAHEB LOMTE Date: 2026.08.07 17:48:34 +0530

---------------

आरोपीची सही/अंगठा
दिनांक : ०७.०८.२०२६.

**(शलाका आ. लोमटे)**
**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, धुळे.**
**(न्यायालय क्र.२)**

आरोपी न्यायालयासमोर हजर झाला. गुन्ह्याचा तपशील आरोपीस त्याचे भाषेत वाचुन व स्पष्ट करुन सांगण्यात आला. आरोपीने आपला गुन्हा न्यायालयासमोर स्वतःहून कबुल केला. आरोपीने गुन्हा कबुल केल्याबाबत मी आश्वस्त आहे. म्हणून आरोपीस वरील कलमांतर्गत दोषी ठरविण्यात येत आहे. आरोपीला गुन्ह्याचे शिक्षेबाबत विचारले असता आरोपीने तो घरातील एक कमवता व्यक्ती असल्याचे व त्याची आर्थिक परिस्थीती गरीबीची असल्याचे सांगितले व त्याला गुन्ह्यात कमीत कमी द्रव्य दंडाची शिक्षा होणेबाबत न्यायालयाला विनंती केली आहे. आरोपीचे कथन व गुन्ह्याचे स्वरुप लक्षात घेता माझे असे मत आहे की खालील आदेश न्यायाचे दृष्टीने योग्य होईल.

## आदेश

१. आरोपी **धिरज महेश अग्रवाल,** यास **भारतीय नागरीक सुरक्षा संहितेच्या कलम २७५** नुसार **मोटार वाहन कायदा कलम १८५** प्रमाणे दोषी ठरविण्यात येवुन गुन्ह्यासाठी रक्कम रुपये १०,०००/- (रुपये दहा हजार मात्र) एवढ्या द्रव्य दंडाची शिक्षा ठोठावण्यात येत आहे व दंड न भरल्यास एक महिन्याचा साधा कारावास भोगावा.

२. सदर न्यायनिर्णयाची प्रत आरोपीस मोफत देण्यात यावी.

SHALAKA ANNASAHEB LOMTE Digitally signed by SHALAKA ANNASAHEB LOMTE Date: 2026.08.07 17:48:40 +0530

धुळे.
दिनांक : ०७.०८.२०२६.

**(शलाका आ. लोमटे)**
**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, धुळे.**
**(न्यायालय क्र.२)**

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी प्रमाणित करतो की, सदर पी.डी.एफ. संचिकेच्या मजकुरातील शब्द–न–शब्द मुळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नांव :– मयुर योगेंद्र जाधव.

न्यायालयाचे नांव :– न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, धुळे (न्यायालय क्र.२).

पी.डी.एफ.संचिका अपलोड केल्याचा दिनांक :– ०७.०८.२०२६.

सही/–

लघुलेखक (श्रेणी–३)